कृषि विद्यापीठांतर्गत शेतीची कामे करणा-या शेत मजुरांना व कृषि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालय/संस्थातील शेत मजुरांना किमान वेतन कायद्याअंतर्गत लागु केलेला सुधारीत विशेष भत्ता लागु करणेबाबत.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

वाचाः
१. उद्योग उर्जा कामगार विभाग अधिसुचना क्र.एमडब्ल्युए-२०१४/२४६/सीआर-५६/एलएबी-७,दि. ०८/०८/१४.
२. शासन पत्र क्र.पंदेवि-१३१६/प्र.क्र.५६/६-अे, दिनांक १०/०८/२०१६.
३. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीएमसी/विशेष भत्ता/२०२३/२२१६, दिनांक ०६/११/२०२३.
४. कामगार उपआयुक्त (ग्रा.वि.) यांनी दिनांक ०४/०२/२०२६ च्या पत्रान्वे जाहिर केलेल्या विशेष भत्त्याबाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाने संदर्भ ०१ नुसार महाराष्ट्र राज्यातील शेत मजुरांच्या किमान वेतन दरात वाढ झाल्याबाबतचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेली अधिसुचना आवश्यक कार्यवाहीसाठी विद्यापीठास प्राप्त झाल्यामुळे कृषि विद्यापीठातील सर्व कृषि महाविद्यालये, प्रक्षेत्रे, योजना, कृषि तंत्र विद्यालय इत्यादी ठिकाणी कार्यरत असणा-या रोजंदार मजुर/तांत्रिक रोजंदार मजुरांना दैनिक दर दि. ०८ ऑगष्ट, २०१४ पासुन लागु करण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. ०४ वर नमुद परिपत्रकानुसार कामगार उपआयुक्त (ग्रा.वि.) यांनी दि. ०४ फेब्रुवारी, २०२६ रोजी किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील **'शेतकी कामधंदा'** या शिर्षाअंतर्गत काम कारणा-या कामगारांना विशेष भत्त्याबाबतचे दर दिनांक ०१/०१/२०२६ ते ३०/०६/२०२६ या कालावधीकरीता जाहिर करण्यात आले आहेत.

## आदेश

**जा.क्रमांक बीएमसी/विशेष भत्ता/२०२६/** 1330 **दिनांक :-०६ जुलै, २०२६**

असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त नमुद परिपत्रकातील अनुज्ञेय असलेले विशेष भत्त्याचे सुधारीत दर पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१ जानेवारी, २०२६ पासुन विद्यापीठातील रोजंदार मजुर/तांत्रिक रोजंदार मजुरांना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे लागु करण्यात यावे व त्यानुसार थकबाकी अदा करण्यात यावी.

**तक्ता**

| अनुसूचित उद्योगाचे नांव | प्रचलित विशेष भत्याचे दर | सुधारीत विशेष भत्याचे दर | कालावधी |
|---|---|---|---|
| **संस्थात्मक शेती** 'शेतकी कामधंदा' | ४२५९/-प्रति महिना | **४२८५/- प्रति महिना** | ०१/०१/२०२६ ते ३०/०६/२०२६ |

उपरोक्त निर्दीष्ट केलेला सुधारीत विशेष भत्ता प्रतिमहिना रोजंदारीचे प्रती दिवसाप्रमाणे हजर दिवसाचे देयक अदा करावे, तसेच रोजंदार कामगारांना देय असलेले मजुरीचे व विश्७षेष भत्याचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या व विशेष भत्त्याच्या दरांना २६ ने भागुन प्रती दिवसाची मजुरी अदा करावी, तथापी विशेष भत्त्याकरीता प्रतीमाह ठरविलेल्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिका-यांची राहील. याकरीता होणारा खर्च आस्थापनेवरील संबंधित कार्यालयाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजुर केलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

उपरोक्त आदेश विद्यापीठ वित्त प्रशासन विभागाच्या सहमतीने व मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीने निर्गमित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी :- सर्व संबंधितांना
..............................................

उपकुलसचिव (आस्थापना),
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला